I O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** सिल्लोड सिटी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0038 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/03/2024 03:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 01/03/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/03/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Time From (वेळेपासून):** 17:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/03/2024 **Time (वेळ):** 02:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/03/2024 02:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सहनिबंधक कार्यालय सिल्लोड,सिल्लोड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): लक्ष्मण सुर्यभान दिवटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | आमठाना,सिल्लोड,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | आमठाना,सिल्लोड,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन न.):

**Mobile** (मोबाइल न.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | छगन उत्तमराव पाटील | | | 1. प्लट नं 3 हिमायतबाग,,छत्रपती सभाजी नगर,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | भीमराव किसन खरात | | | 1. जयभवानी नगर,सिल्लोड,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000रु ज्यात भारतीयचलनी 500रु दराच्या 10 नोटा ज्यास अ.पा लावलेल्या नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी लक्ष्मण सुर्यभान दिवटे, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती, रा. मु.पो. आमठाणा, ता. सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9403691106

मी दिनांक 27/02/2024 रोजी सिल्लोड येथे पोलीस निरीक्षक, सचिन साळुंखे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दोन पंचासमक्ष माझे हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली होती की, मी वरील ठिकाणी परिवारासह राहतो व माझी वडीलोपार्जीत शेती असुन आम्ही शेती करतो.

मला माझी पत्नी सौ. शारदा लक्ष्मण दिवटे यांच्या नावे शासकीय विहीरीचे अनुदान मंजुर करण्यासाठी अर्ज करावयाचा आहे. परंतु शासकीय विहीरीचे लाभ मिळविण्यासाठी लाभार्थीच्या नावे 40 आर (एक एकर) क्षेत्र लागते. तसेच मौजे धावडा गट नं. 44/1 मध्ये माझ्या पत्नीच्या नावे फक्त 23 आर क्षेत्रफळ आहे. त्याकरीता मी माझे स्वत:चे व माझी भावजय नामे सौ. ज्योती पोपट दिवटे यांच्या नावे सामाईक क्षेत्र असलेल्या मौजे धावडा ता.सिल्लोड येथील गट नं 47/1 मधील लागवडी योग्य क्षेत्रफळ 0.20 आर शेत जमीन माझी पत्नी सौ. शारदा लक्ष्मण दिवटे यांच्या नावे खरेदी खताद्वारे करून देण्यासाठी मी दिनांक 22/02/2024 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड येथील दुय्यम निबंधक अधिकारी श्री..सी. यु. पाटील यांना जावुन भेटलो. त्यावेळी मी दुय्यम निबंधक अधिकारी श्री..सी. यु. पाटील यांच्याशी माझ्या वरील कामासंबंधी चर्चा केली. त्यावेळी दुय्यम निबंधक अधिकारी श्री. सी. यु. पाटील यांनी मला सांगितले की, मौजे धावडा ता. सिल्लोड गट नं. 47/1 मधील 0.20 आर क्षेत्र असलेली जमीन तुमच्या व सौ. ज्योती पोपट दिवटे यांचे नावे असलेले सामाईक क्षेत्र 0.20 आर तुमची पत्नी सौ. शारदा लक्ष्मण दिवटे यांच्या नावे खरेदी खताद्वारे करावयाचे असेल तर शासकीय फी भरावी लागेल व त्या व्यतिरीक्त खरेदीखत करुन देण्यासाठी मला तुम्ही 5000/- हजार रूपये द्यावे लागतील. तरच तुमचे खरेदी खत होईल. तुम्ही मला 5000/- रूपये नाही दिले तर मी तुमचे खरेदीखत करणार नाही. त्यासाठी तुम्ही स्टँप व्हेंडर खरात यांना जाऊन भेटा ते तुम्हाला सांगितल त्याप्रमाणे तुम्ही त्यांचेकडे 5,000/- रुपये देऊन टाका. त्यानंतर मी तुमचे खरेदीखत करुन देतो. असे म्हटल्याने मी श्री. पाटील यांना 5,000/- रुपये दिले नाहीतर ते माझे पत्नीचे नावे खरेदीखत करणार नाही. व आमचे शासकीय विहीरीचे अनुदान मंजुर होणार नाही. त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन माझ्याकडे सध्या पैसे नाहीत मी तुम्हाला नंतर येवुन भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलो.

मला दुय्यम निबंधक श्री. सी. यु.पाटील यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 26/02/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस निरीक्षक श्री.साळुंखे यांचे मोबाईलवर संपर्क करून त्यांना कळविले की, एक लोकसेवक मला खरेदी खत करुन देण्यासाठी लाचेची मागणी करीत आहे. तेव्हा तुम्ही उद्या सिल्लोड येथे येवुन माझी तक्रार घेवुन त्यांचेवर कार्यवाही करावी .असे कळविल्याने दिनांक 27/02/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री. सचिन सांळुखे हे त्यांचे पथक व दोन पंचासह सिल्लोड येथे आले.

तेव्हा त्यांनी त्यांचे सोबत असलेल्या दोन पंचाची व पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी आज 27/02/2024 रोजी दुय्यम निबंधक श्री. सी.यु. पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे स्टँप व्हेंडर श्री. खरात यांची तसेच सी.यु. पाटील यांची भेट घेऊन त्यांना माझे वरील खरेदीखत करुन देण्यासाठी विनंती करायला जाणार आहे. तेव्हा दुय्यम निबंधक, कार्यालय सिल्लोड येथील श्री. सी.यु. पाटील किंवा त्यांनी सांगितलेले स्टँप व्हेंडर श्री. खरात यांनी माझ्याकडे माझे वरील खरेदीखताचे शासकीय फी व्यतिरीक्त पैशाची मागणी केल्यास त्यांना शासकीय फी

व्यतिरीक्त पैसे द्यायची माझी इच्छा नाही. माझेत व त्यांचे पैशाचा देण्याघेण्याचा, उसणवारीचा व्यवहार नाही., वैरदुश्मनी नाही. त्यांनी माझ्याकडे माझे वरील खरेदीखताचे शासकीय फी व्यतिरीक्त पैशाची मागणी केल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कार्यवाही होणेस विनंती आहे. वगैरे मजकुराची तक्रार लिहुन दिल्याने माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक, सचिन साळुंखे यांनी पंच व आमच्या सर्वानुमते पैशाची मागणी होते किंवा कसे याची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय दिनांक 27/02/2024 रोजी घेऊन आम्हा सर्वांना सापळा कारवाईच्या बाबत सुचना देऊन माहीती दिली.

त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन पंच क्र. 1 यांना सोबत घेऊन माझ्या कडील मोटार सायकलने, दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड येथील कार्यालयात दुय्यम निबंधक श्री. सी.यु. पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे श्री. खरात यांच्या भेटी करीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड येथील कार्यालयात गेल्यानंतर मला श्री. खरात दिसले नाही. तेव्हा मी दुय्यम निबंधक कार्यालयात विचारपुस केली असता मला समजले की, श्री. खरात यांची तब्येत बरोबर नसल्या कारणाने दवाखान्यात गेल्याबाबत कळाल्याने मी श्री. सी.यु. पाटील यांचे कक्षात जाऊन भेटलो असता तेव्हा माझी व त्यांच्यात माझे गट नं. 47/1 बाबत खरेदीखत करुन देण्याबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान श्री. पाटील यांना म्हणालो की, मिसेसच त्या खालच्या सातबाऱ्यात नाव हे दुसऱ्या गटामधी तेच म्हणल खर्च वगैरे काय लागल ते बघु..सर मकाच क्षेत्र हे त्याच्यामधी बरका ते तलाठ्याकडुन करून घेतो मी वाटल्यास ते पिकपेरा घेतेल नाही..त्यावर दुय्यम निबंधक श्री. पाटील म्हणाले की, ते काय हिसाब हे आपल्याला दहा ते विस पर्यंत बागायीतचेच दर लावे लागते..विसच्यापुढ असत ना मग जिरायतचे हे..त्यावर मी त्यांना म्हणालो की, ..चलन किती टक्क्याने राहते सर हे..त्यावर श्री.पाटील म्हणाले की हे सहा टक्के..दोन लाख एक्कावन्न हजार गुनीला सहा टक्के म्हणजे पंधरा झिरो साठ म्हणजे पंधरा हजार शंभर आणि जे काय पान होतात ते विस रूपये पानाप्रमाणे पैसे लागतात..त्यावर मी म्हणालो की, एवढाच खर्च लागेल का मग सर..त्यानंतर श्री.पाटील. म्हणाले की तेवढाच तेवढाच.. बाकीचे तुमचे दोस्तच हे ईथं खरात साहेब.. असे म्हणताच मी त्यांना म्हणालो की, खरात साहेबाला भेटुन घेतो वाटल्यास.. त्यावर श्री.पाटील. म्हणाले की म्हणुनच म्हणल काही..बाकी काही असे म्हणाले असता त्यांना मी चालेल असे म्हणुन निघुन आलो. त्यानंतर आमचा दिनांक 28/03/2024 रोजी आमठाणा गावाचा आठवडी बाजार असल्यामुळे मला महत्वाचे काम असल्याकारणाने वेळ मिळाला नाही.

त्यानंतर मी दिनांक 29/02/2024 रोजी सिल्लोड येथे ड्राफ्ट तयार करुन 15,110/- रुपयाचा शासकीय चलनाचा भरणा करुन ड्राफ्ट तयार झाल्यानंतर व चलनाची प्रत तयार झाल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सचिन साळुंखे यांना संपर्क साधुन त्यांना सिल्लोड येथे दिनांक 01/03/2024 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय सिल्लोड येथे माझ्या कामानिमीत्ताने जाणार असल्याने तुम्ही देखील सिल्लोड येथे तुमचे पथकासह येऊन जा असे फोनद्वारे कळविले होते. त्यावरुन श्री. साळुंखे साहेब हे दिनांक 01/03/2024 रोजी पंच व त्यांचे पथकासह सिल्लोड येथे सुरक्षित ठिकाणी हजर आले. तेव्हा मी त्यांची भेट घेवुन त्यांना कळविले की, आमचा खरेदीखत करण्यासाठीचा ड्राफ्ट नंबर लावण्यासाठी श्री. खरात यांचेकडे दिला असुन त्यांनी दुपारी खरेदीखत करण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड येथे बोलावले आहे. असे सांगितले. तेव्हा मला पोलीस निरीक्षक, श्री. सचिन साळुंखे यांनी थोडक्यात सुचना देवुन माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन पंच क्र. 1 यांना सोबत घेऊन माझ्या कडील मोटार सायकलने, दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड येथील कार्यालयात श्री. खरात यांच्या भेटी करीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड येथील कार्यालयात गेल्यानंतर श्री. खरात यांना भेटलो तेव्हा आमची माझ्या खरेदीखताच्या संदर्भाने चर्चा झाली तेव्हा मी श्री. खरात यांना म्हणालो की, मी चलन भरलेले आहे. तेव्हा श्री. खरात म्हणाले की, हे कामाच का..हे कामच होवुन जाऊल खुर्चीवरच काय देण घेण तुमच्या हातानच देवुन टाकायचे. काय बोलत बसायच नाही काम करून घ्या आधी. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, काम करायला विचारून घेवु ना आपुन ते नंतर काहीबी सांगत्या मग..तेव्हा श्री. खरात म्हणाले की, ते रेगुलर अस पाच हजार घेत..टायमावर काय तुम्हाला हजार दोन हजार. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, नाही ना मग त्याह्याला सांगाव लागल ना बरेचसे काम केले म्हणा साहेब द्या म्हणा करून नुसत विचारून येवु ना आपुन त्याह्याला..आम्हाला बी कळन ना मग...असे म्हणालो असता श्री. खरात यांनी या.असे म्हणुन मला दुय्यम निबंधक श्री. पाटील यांचे कक्षात घेवुन गेल्यानंतर श्री. खरात यांनी श्री.पाटील यांना उद्देशुन यांच एक काम हे.. असे म्हणाले असता मी श्री. पाटील यांना म्हणालो की, धावड्याच..चलन वगैरे भरल आपन सगळ.. तेव्हा श्री. पाटील म्हणाले की, चलन काढल का..काढायच असे म्हणाले असता मी त्यांना म्हणालो की, लगे भरलय सगळ कंपलेट केलेल हे लगी..तेव्हा श्री. पाटील म्हणाले की, एखाद्या तासात उरकून जाईल हु.. मी त्यांना म्हणालो की, ते समाईक हे ना समाईकवाल्याला सांगायच होत आपल्याला..आपन चलन वैगेरे सगळ कम्पलेट केलेल हे म्हटल मग सरांच काय असेल..असे म्हणालो

असता श्री. खरात म्हणाले की, चलन त करावच लागत..सरांच काय हे ते तेव्हा श्री. पाटील म्हणाले की, तुम्ही नाही सांगीतल का..तेव्हा श्री. खरात म्हणाले की, मी सांगीतले पाच तेव्हा श्री. पाटील म्हणाले की, जास्त करायचे तर करा..काय करता येईल ते, पाच च्या ऐवजी सहा करा तेव्हा श्री. खराती म्हणाले की, सहा करा..काही आडचण नाही..असे म्हणताच श्री. पाटील म्हणाले की, तुमचे लवकर घेऊ तुम्हा लवकर मोकळं करुन देऊ त्यावर श्री. खरात म्हणाले की, मग पाच आणायचे..पाच देवुन टाकायचे तुमच एकट्याच असलत कमी करू आपण,.मोठ काम असल त दहा विस हजाराच असल त दहा एकच देवु दहाचा फायदा करून घेवु..आस विस देतोच ना आपुन..दहाच देवु..मग..असे म्हणुन श्री. सी.यु. पाटील व श्री. खरात यांनी माझे स्वत:चे व माझी भावजय नामे सौ. ज्योती पोपट दिवटे यांच्या नावे सामाईक क्षेत्र असलेल्या मौजे धावडा ता.सिल्लोड येथील गट नं 47/1 मधील लागवडी योग्य क्षेत्रफळ 0.20 आर शेत जमीन माझी पत्नी सौ. शारदा लक्ष्मण दिवटे यांच्या नावे खरेदी खत करून देण्यासाठी पंच क्र. 1 यांचे समक्ष लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले.
दुय्यम निबंधक श्री. सी.यु. पाटील व श्री. खरात यांनी माझ्याकडे मागणी केलेली रक्कम 5,000/- रुपये ज्यामध्ये पाचशे रुपये दराच्या दहा चलनी नोटा पोलीस निरीक्षक, सचिन साळुंखे यांचेकडे हजर केले व त्यांना सांगितले की, दुय्यम निबंधक श्री. सी.यु. पाटील व श्री. खरात यांनी मला सदर लाचेची रक्कम घेऊन दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड येथे बोलविले आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक, सचिन साळुंखे यांनी त्या नोटांचे नंबर घेऊन त्या नोटांना त्यांच्या पथकातील पोलीसाकडुन पंचासमक्ष पावडर (ऍन्थ्रॉसीन पावडर) लावुन माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पंच क्र.1 यांच्यासह माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे माझ्या मोटार सायकलने दुय्यम निबंधक श्री. सी.यु. पाटील व श्री. खरात यांचे भेटी करता दुय्यम निबंधक कार्यालय,सिल्लोड येथे गेलो. त्या ठिकाणी पोहोचल्यावर श्री. खरात यांची भेट घेतली असता श्री खरात म्हणाले की, तुमचा नंबर आला होता तुम्ही कुठे होते, तेव्हा मी त्यांना म्हणालो की, खरात साहेब तुम्ही असं कामं घेतात तेव्हा खरात म्हणाले की, आता घेतल ना मंग तुमचंच हे ना मग असे म्हणुन मला श्री.पाटील यांचे कक्षात घेवुन गेले. त्यानंतर मी श्री. खरात यांना 5,000/- रुपये लाचेची रक्कम देऊ केली असता त्यांनी अगोदर राहु दे असे म्हणुन नंतर लाचेची रक्कम किती आहे. (सी.सी.टी.एन.एस प्रणाली मध्ये 8000 अक्षरांची मर्यादा असल्या कारणाने उर्वरीत फिर्यादी ही स्वतंत्र पानावर घेवुन सोबत जोडुन सादर केली आहे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):

sheshrao abaji udar(I (Inspector)) / **or** (**किंवा**)

(2) **Directed (Name of I.O.)** (**तपास अधिका-याचे नाव**):

**Rank** (**पद**): **No.**(**क्र.**):

**to take up the Investigation** (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) **or** (**किंवा**)

(3) **Refused investigation due to** (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नांव): Sheshrao abaji udar
**Rank** (पद): [illegible]
**No.**(सं.):

असे म्हणुन उजव्या हातात घेतले तेव्हा मी त्यांना म्हणालो की, मोजुन घ्या तेव्हा श्री.खरात यांनी लाचेची रक्कम 5,000/- रुपये मोजुन घेऊन त्यांच्या पँटच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्यानंतर मी पुर्वनियोजीत ठरलेला इशारा केला ती वेळ 17.05 वाजेची होती. माझ्या इशाऱ्या नंतर लगेचच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी हजर आले. त्यांनी दुय्यम निबंधक, श्री.खरात यांना ताब्यात घेतले. त्यांना सापळा पथकाचा परिचय देवून त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव भीमराव किसन खरात, वय-58 वर्षे, व्यवसाय- स्टँप व्हेंडर, रा. प्लॉट नं. 40 जय भवानीनगर सिल्लोड ता.सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. त्यानंतर श्री. पाटील यांना ताब्यात घेऊन सचिन साळुंखे यांनी त्यांचे नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव छगन उत्तमराव पाटील, वय-49 वर्षे व्यवसाय -नोकरी पद - सह दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय सिल्लोड रा. प्लॉट नं. 3 हिमायतबाग, छत्रपती संभाजीनगर त्यानंतर श्री. भीमराव खरात यांचे ताब्यातुन 500/- रुपये दराच्या दहा चलनी नोटा असे एकुण 5,000/- रुपये पोलीस निरीक्षक, सचिन साळुंखे यांनी सांगितल्यावरुन पंच क्रं. 2 यांनी काढुन त्यांच्याकडे ठेवल्या.

तरी दिनांक 01/03/2024 रोजी सह दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय सिल्लोड येथे 17.05 वाजता श्री. छगन उत्तमराव पाटील, वय-49 वर्षे व्यवसाय -नोकरी पद - सह दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय सिल्लोड रा. प्लॉट नं. 3 हिमायतबाग, छत्रपती संभाजीनगर यांनी माझे स्वत:चे व माझी भावजय नामे सौ. ज्योती पोपट दिवटे यांच्या नावे सामाईक क्षेत्र असलेल्या मौजे धावडा ता.सिल्लोड येथील गट नं 47/1 मधील लागवडी योग्य क्षेत्रफळ 0.20 आर शेत जमीन माझी पत्नी सौ. शारदा लक्ष्मण दिवटे यांच्या नावे खरेदी खत करून देण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी केली सदर लाचेची रक्कम 5000/- रुपये श्री. भीमराव किसन खरात, वय-58 वर्षे, व्यवसाय- स्टँप व्हेंडर, रा. प्लॉट नं. 40 जय भवानीनगर सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी पंच क्र.1 यांचे समक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

हि फिर्याद दिली सही.

पोलीस ठाणे सिल्लोड (शहर)
जि. छ... संभाजीनगर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**